# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Shyam Khandare
Director
Ph. No. - 9765082096

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 1259 /2021 Dt: 13 / 07 /2021

प्रति,

मा. प्राचार्य/रासेयो कार्यक्रम अधिकारी,
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय :– रासेयो जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक करीता प्रस्ताव सादर करण्याबाबत.
संदर्भः– नोटशिट क्र.रासेयो –१२५३/२०२१ दिं. ३०/०६/२०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये कळविण्यात येते कि, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. करीता विभागीय समन्वयक व जिल्हा समन्वयकाची निवड करावयाची असल्याने खालील पात्रता पुर्ण करणाऱ्या ईच्छुक रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यानी आपले प्रस्ताव राष्ट्रीय सेवा योजना विभाग, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांच्या यांच्या कडे दिनांक २४/०७/२०२१ पर्यंत सादर करावे.

विभागीय समन्वयक पात्रताः–

१) महाविद्यालयामध्ये २ ते ३ वर्ष कार्यक्रम अधिकारी म्हणुन कार्य करण्याचा अनुभव.
२) किमान दोन विशेष शिबिराचे आयोजन आणि विद्यापीठ/राज्यस्तरीय आयोजनात सहभाग.
३) १० दिवसाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी उदबोधन पुर्ण केले असल्याचे प्रमाणपत्र.
४) विद्यापीठ रासेयो कक्षाकडे पुर्ण वर्षाचे अभिलेख व अंकेक्षण विवरण जमा केल्याचे प्रमाणपत्र.
५) किमान ५ ते ८ महाविद्यालयामध्ये समन्वयक प्रस्तावीत करण्याची क्षमता व सवांद कौशल्य.
६) जिल्हा, विद्यापीठ राज्य व राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात सहभाग किवा रासेयो सहभाग किवा रासेयो पुरस्कार प्राप्त अधिकाऱ्यांना प्राध्यान्य.

जिल्हा समन्वयक: पात्रताः–

१) कमीत कमी ३ वर्ष रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणुन कार्य करण्याचा अनुभव.
२) किमान तिन विशेष शिबिराचे आयोजन आणि विद्यापीठ/राज्यस्तरीय आयोजनात सहभाग.
३) कार्यक्रम अधिकारी उदबोधन/उजळणी अभ्यासक्रम पुर्ण केले असल्याचे प्रमाणपत्र.
४) जिल्हयातील मिहाविद्यालयामध्ये समन्वयक प्रस्तावीत करण्याची क्षमता व संवाद कौशल्य.
५) जिल्हा समन्वयकचा कालावधी तीन वर्ष राहील.
६) जिल्हा, विद्यापीठ राज्य व राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात सहभाग किवा रासेयो सहभाग किवा रासेयो पुरस्कार प्राप्त अधिकाऱ्यांना प्राध्यान्य.

13/07/2021
(डॉ. श्याम एस खंडारे)
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

| | | |
|---|---|---|
| अ) रासेयोच्या नियमित कार्यक्रमांतर्गत १२० तास सहभाग | – | ०३ गुण |
| ब) सात दिवसीय विशेष शिबिरात सहभाग | – | ०३ गुण |
| क) राष्ट्रीय/राज्य/विद्यापीठस्तरावर आयोजित केलेला शिबिर, रक्तदान/अन्य उपक्रमात सहभाग | – | ०४ गुण |
| एकुण | – | १० गुण |

प्रोत्साहन गुणांचे विवरण लीगल पेजवर विद्यापीठाने निर्धारित केलेल्या प्रारूपात आणि कालमर्यादा विचारात घेऊन **परीक्षा नियंत्रक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** यांचेकडे पाठविण्याची व्यवस्था करावी. संबंधीत अधिकाऱ्यांकडे जे विवरण पाठविण्यात येईल त्याची एक प्रत **कार्यक्रम समन्वयक रासेयो, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** यांचेकडे अभिलेखास्तव १५ मार्च पर्यंत पाठवावी. अन्यथा निर्धारण कालावधीनंतर विवरणांचा विचार प्रोत्साहन गुण आवंटनाकरिता केला जाणार नाही.

## स्वयंसेवक पेढी

जिल्हा/विद्यापीठ/राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रकल्प/शिबिरे/कार्यशाळा यामध्ये सहभागी होण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण कौशल्य असणाऱ्या रासेयो स्वयंसेवकांची यादी म्हणजे स्वयंसेवक पेढी. बहुतेक वेळा बऱ्याच कार्यक्रमांमध्ये स्वयंसेवक सहभागी होण्यासाठी कमी कालावधीमध्ये स्वयंसेवक पाठविणे आवश्यक असते, अशा वेळेस स्वयंसेवक पेढीचा उपयोग महाविद्यालयाने तसेच जिल्हा समन्वयकांनी करावयाचा असतो.

## विभागीय समन्वयक : पात्रता

१) रासेयो मध्ये २ ते ३ वर्षे कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्य करण्याचा अनुभव.

२) किमान दोन विशेष शिबिरांचे आयोजन आणि विद्यापीठ/राज्यस्तरीय आयोजनात सहभाग.

३) १० दिवसाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी उद्‌बोधन पूर्ण केले असल्याचे प्रमाणपत्र.

४) विद्यापीठ रासेयो कक्षाकडे पूर्ण वर्षाचे अभिलेख व अंकेक्षित विवरण जमा केल्याचे प्रमाणपत्र.

५) किमान ५ ते ८ महाविद्यालयांमध्ये समन्वय प्रस्थापित करण्याची क्षमता व संवाद कौशल्य..

६) जिल्हा, विद्यापीठ, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात सहभाग किंवा रासेयो पुरस्कार प्राप्त अधिकाऱ्यांना प्राधान्य.

## विभागीय समन्वयक : कार्य

१) विभागातील वर्ग करण्यात आलेल्या महाविद्यालयांशी सातत्याने संपर्क प्रस्थापित करणे.

२) विविध स्तरावर निश्चित झालेल्या उपक्रमांची माहिती संबंधीत महाविद्यालयांना देणे.

३) वर्षातून किमान एकदा अधिनस्थ महाविद्यालयांचे प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी प्रमुखांची सभा आयोजीत करणे.

४) प्रत्येक महाविद्यालयात किमान २० तास उद्‌बोधन होणे आवश्यक आहे. यासाठी कार्यक्रम अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे, शक्य असल्यास उद्‌बोधन प्रसंगी महाविद्यालयात उपस्थित राहणे, विभागीय स्तरावर संयुक्त उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करणे.

५) प्रत्येक महाविद्यालयात रासेयो कक्षाची स्थापना, रासेयो फलक दैनंदिनी व बॅजेसचे वाटप, वार्षिक नियोजन, स्थावर-जंगम मालमत्ता, लेखे व अंकेक्षित विवरणे, रोख पुस्तक व देयके यांची तपासणी करणे.

## जिल्हा समन्वयक : पात्रता

१) कमीत कमी तीन वर्ष रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्य करण्याचा अनुभव.

२) किमान तीन विशेष शिबिरांचे आयोजन आणि विद्यापीठ/राज्यस्तरीय आयोजनात सहभाग.

३) कार्यक्रम अधिकारी म्हणून उद्‌बोधन/उजळणी अभ्यासक्रम पूर्ण केले असल्याचे प्रमाणपत्र.

४) जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये समन्वय प्रस्थापित करण्याची क्षमता व संवाद कौशल्य.

५) जिल्हा समन्वयकाचा कालावधी तीन वर्षे राहील.

६) जिल्हा, विद्यापीठ, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात सहभाग किंवा रासेयो पुरस्कार प्राप्त कार्यक्रम अधिकाऱ्यांना प्राधान्य.

## जिल्हा समन्वयक : कार्य

१) रासेयो कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्ह्यातील महाविद्यालयांच्या रासेयो पथकांना सहकार्य व मार्गदर्शन करणे.

२) रासेयो शिबिरांना व पथकांना भेटी देणे.

३) विशेष शिबिर /जिल्हास्तरीय कार्यक्रम/प्रशिक्षण, कार्यक्रम अधिकाऱ्यांचे उद्‌बोधन कार्यक्रम आयोजनास मदत करणे.

४) विद्यापीठाच्या रासेयो कक्षाकडे अंकेक्षण लेखे व महाविद्यालयांचे रासेयो अहवाल दिलेल्या वेळेत पोहोचतील यासाठी प्रयत्न करणे.

५) महाविद्यालयीन स्तरावरील रासेयो सल्लागार समिती सभा आयोजनास मदत करणे आणि निमंत्रित सदस्य म्हणून सहभागी होणे.

६) रासेयो कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यक्रम समन्वयक आणि रासेयो पथक यांच्यात समन्वय साधणे.

७) जिल्ह्यामध्ये विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्न करणे व कार्यक्रम समन्वयकांना अहवाल सादर करणे.